# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/२-२४/२०२२ दिनांक - ८ जानेवारी, २०२२

संदर्भ - १) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.०६/विशि-३, दि.७.१.२०२२
२) शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.युएनआय/ऑनलाईन वर्ग/२०२१/विशि-१/३२४, दि.७.१.२०२२
३) प्र.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/परिपत्रक/२०२१/५९, दि.७.१.२०२२

कोव्हीड-१९ च्या संभावित तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीच्या अनुषंगाने अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकरीता संदर्भ क्र.१ वरील शासन परिपत्रक निर्गमित केले असून त्यानुषंगाने विद्यापीठातील विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी तसेच शिक्षकेतर कर्मचारी ह्यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत. (प्रत सोबत जोडली आहे.)

१) सर्व शैक्षणिक विभागातील तसेच मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा येथील वर्ग प्रत्यक्ष ऑफलाईन पद्धतीने न घेता दि.१५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत फक्त ऑनलाईन पद्धतीने घेण्यात यावेत.

२) विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी विभागातील शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना शैक्षणिक/कार्यालयीन कामकाजाकरीता ५० टक्के प्रमाणे चक्राकार पद्धतीने विभागामध्ये बोलवावे.

३) नियंत्रण अधिकारी यांनी दररोज चक्राकार पद्धतीने विभागात कामाकरीता बोलाविण्यात येणार असलेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी उपकुलसचिव (प्रशा.) यांना न चुकता सादर करावी.

४) अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, उद्यान विभाग व इतर सेवा) पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी याबाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

५) इतर शिक्षक, संशोधक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मुख्यालय न सोडता घरी राहून (Work form Home) संबंधित कामाचे नियोजन करावे. मात्र त्यांना कार्यालयात बोलविल्यास त्यांना कार्यालयात त्वरीत हजर रहावे लागेल.

६) कार्यालयात कार्यरत असतांना संबंधितांनी तसेच विद्यापीठात येणाऱ्या अभ्यागतांनी कोव्हीड-१९ च्या संदर्भात घ्यावयाच्या काळजीबाबत विद्यापीठ प्रशासनाने दि.२८.५.२०२० रोजी इ-मेल द्वारे प्रसृत केलेल्या मार्गदर्शन सूचनांची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन काटेकोरपणे पालन करावे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, प्रशासकीय विभाग तसेच मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा ह्यांनी संदर्भांकित शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन पुढील कार्यवाही करावी.

स्वा/-
प्र.कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**

१) मा.उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सहसंचालक (उ.शि.), अमरावती विभाग, अमरावती
४) सहसंचालक (तं.शि.), अमरावती विभाग, अमरावती.

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/समन्वयक/प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक त्यांच्या अधिनस्थ अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे व त्याचे काटेकोरपणे पालन करावे.
२) प्र.संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.
३) आरोग्य अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
४) वार्डन, मुलांचे/मुलींचे वसतीगृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रउपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

2/Data/2022/MKW/Korder.pmd(2)

अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नीत महाविद्यालयांमध्ये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०६/विशि-३,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दि. ७ जानेवारी, २०२२.**

**वाचा:-** उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. ०६/विशि-३, दि. १३ ऑक्टोबर, २०२१.

**प्रस्तावना :-**

शासन परिपत्रक दि. १३ ऑक्टोबर, २०२१ अन्वये नियमित वर्ग सुरु करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, कोव्हिड-१९ च्या संभावित तिसऱ्या लाटेमुळे राज्यामध्ये बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असून ओमायक्रॉन या नव्या व्हेरियंटमुळे बाधित रुग्णांची संख्यासुध्दा मोठ्या प्रमाणावर दिवसेंदिवस वाढत आहे. शासनाने दि. २४/१२/२०२१ व ३०/१२/२०२१ च्या आदेशान्वये सार्वजनिक ठिकाणांवर वावरण्यास प्रतिबंध लावले आहेत. या पार्श्वभूमीवर दि. ०४ जानेवारी, २०२२ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरंसिंगद्वारे झालेल्या बैठकीमध्ये सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु, सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, अतिरिक्त आयुक्त-मुंबई महानगरपालिका यांच्यासमवेत विद्यापीठे व महाविद्यालयातील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेणे, त्याचप्रमाणे वसतीगृहे/लसीकरणासंदर्भात चर्चा झाली. वेगाने वाढत असलेल्या कोव्हिड-१९ व ओमायक्रॉनच्या रुग्णांची संख्या पाहता समुहसंसर्गाचा धोका टाळण्यासाठी व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी विद्यापीठे व महाविद्यालयातील वर्ग तसेच इतर बाबींसंदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

शासन परिपत्रक, दि. १३ ऑक्टोबर, २०२१ अधिक्रमित करण्यात येत असून उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील **वर्ग** प्रत्यक्ष ऑफलाईन पध्दतीने न घेता दि. १५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने सुरु ठेवण्यात यावेत.

२) सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील **परीक्षा** ऑनलाईन पध्दतीने घेण्यात यावी.

विजेची अनुपलब्धता किंवा नेटवर्क कनेक्टीविटी नसल्यामुळे किंवा विद्यार्थी अथवा त्याचे कुटुंबीय कोरोना बाधित असल्यास किंवा आरोग्यविषयक इतर समस्यांमुळे विद्यार्थी परीक्षा देऊ शकला नाही तर अशा विद्यार्थ्याची ऑनलाईन पध्दतीने पुनर्परीक्षा घेण्यात यावी. परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित काही भागात तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यापीठाशी व नांदेड विद्यापीठाशी संलग्नित काही भागात नेटवर्कींग सेवा विस्कळीत असल्यास किंवा उपलब्ध नसल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन ऑफलाईन स्वरुपात या भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात याव्यात.

३) परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठे/महाविद्यालयांनी हेल्पलाईनची व्यवस्था करावी. परीक्षा व्यवस्थितरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळावर परीक्षांचा अभ्यासक्रम, नमुना प्रश्नसंच, हेल्पलाईन नंबर इ. स्वयंस्पष्ट माहिती उपलब्ध करुन द्यावी.

४) सर्व विद्यापीठे तसेच महाविद्यालयांशी निगडित वसतीगृहात राहत असलेल्या विद्यार्थ्यांना पुर्वसूचना व कालावधी देऊन ही वसतीगृहे बंद करण्यात यावीत. फक्त परदेशी विद्यार्थी, प्रयोगशाळांमध्ये संशोधन करीत असलेले विद्यार्थी तसेच पीएचडीचे विद्यार्थी यांना वसतीगृहात राहण्याची परवानगी देण्यात यावी. केंद्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्था जसे- आयआयटी, आयआयएम इ. येथील वसतीगृहांबाबतचा निर्णय त्या त्या ठिकाणची परिस्थिती पाहून संबंधित संस्थांच्या संचालकांनी घ्यावा. या विद्यार्थ्यांना संसर्ग होणार नाही याबाबत विद्यापीठ व महाविद्यालय प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी. स्थानिक प्राधिकरणांना कोविड केअर सेंटर म्हणून वसतीगृहांची आवश्यकता असल्यास ती उपलब्ध करुन देण्यात यावीत.

५) विद्यापीठे तसेच महाविद्यालयांनी अद्याप लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांची यादी स्थानिक प्राधिकरणांना देऊन लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून तसेच विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून तातडीने लसीकरण पूर्ण करुन घ्यावे.

६) तंत्रनिकेतनामधील विद्यार्थी १५ ते १८ या वयोगटातील असल्याने व या वयोगटातील व्यक्तींचे लसीकरण सुरु झाले असल्याने संचालक (तंत्र शिक्षण) यांनी लसीकरण करावयाच्या विद्यार्थ्यांची यादी स्थानिक प्राधिकरणांना उपलब्ध करुन द्यावी व विशेष मोहिमेद्वारे लसीकरण पूर्ण करण्यात यावे.

७) संचालक (कला) यांनी कला विषयाबाबतच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यासाठी परीक्षेचे / प्रश्नपत्रिकेचे स्वरुप निश्चित करावे.

८) ज्या शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण झालेले नाही त्यांचा तपशिल संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना उपलब्ध करुन देऊन व संबंधित प्राधिकरणांशी संपर्क साधुन विशेष मोहिम राबवून लसीकरण पूर्ण करुन घेण्यात यावे.

९) सार्वजनिक विद्यापीठे तसेच त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयीन शिक्षकीय / शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती ५०% करण्यात येऊन चक्राकार पध्दतीने त्यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत व वर्क फ्रॉम होम बाबत विद्यापीठाने नियोजन करावे.

१०) १५ फेब्रुवारी, २०२२ नंतर परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्देश देण्यात येतील.

सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२०१०७१७३४५३०२०८ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अजित म. बाविस्कर)
उप सचिव

प्रत –

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
४. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. सर्व महानगरपालिका आयुक्त.
७. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे.
८. कुलगुरू, सर्व अभिमत विद्यापीठे.
९. कुलगुरू, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१०. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
११. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
१२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
१३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१४. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
१५. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
१६. निवड नस्ती.